**Newspaper - Maharashtra Times**

**Date - 30.5.2021**

# संपदा फाळकेला राज्यस्तरीय क्रिडारत्न पुरस्कार



**-राजाराम वामण-**

**जिल्हा टाईम्स मुंबई, दि.३०-** मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी आयोजित गुणिजन गौरव महापरिषद २०२१ यांच्या वतीने सालाबादप्रमाणे याहीवर्षी देण्यात येणारा राज्यस्तरीय आदर्श यूवती महाराष्ट्र युथ आयडॉल क्रिडारत्न पुरस्कार २०२०. कृष्णाजी जगदाळे (संस्थापक, अध्यक्ष) यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाइन देण्यात आला.

मुंबई जिल्ह्यातून पुरस्कार मानकरी राष्ट्रिय जुदो पटटू आणि खेलो इंडिया स्पर्धे तील रौप्य पदक विजेती कुमारी संपदा संजय फाळके ह्या पोदार कॉलेज माटूंगा येथील नुकत्याच बी. कॉम झालेल्या विद्यार्थिनीला बहाल करण्यात आला. संपदा ही चिंचपोकळी येथील नेकजात मराठा क्रिडा मंडळाची रहिवाशी असुन तिचे रविंद्र पाटील हे तिचे प्रशिक्षक आहेत अशा गुणी खेळाडूचे लालबाग विभागात सर्वत्र कौतूक होत आहे.